सहाय्यक पोलीस अधीक्षकांची सात अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.
परिविक्षाधीन भारतीय पोलीस सेवा अधिकारी-७० वी तुकडी

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : आयपीएस-०३१८/प्र.क्र.४७०/पोल-१,
२ रा मजला, मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ०९ मे, २०१९

पहावे:- १) अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.अपोमसं/प्रशि-२/६९ आर.आर.बॅच/५८३/२०१८/३२१६, दिनांक ०४.१२.२०१८.
२) शासन निर्णय गृह विभाग क्र. आयपीएस-०३१८/प्र.क्र.४७०/पोल-१, दि.१७.१२.२०१८,
३) शासन शुध्दीपत्रक गृह विभाग क्र. आयपीएस-०३१८/प्र.क्र.४७०/पोल-१, दि.२८.१.२०१९

प्रस्तावना :-

भारतीय पोलीस सेवेच्या ७० व्या तुकडीतील सात परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना ते महाराष्ट्र राज्यात परिविक्षाधीन म्हणून रुजू झाल्यापासून म्हणजेच दि.१२.११.२०१८ ते दि.२४.०५.२०१९ पर्यंतच्या कालावधीत महाराष्ट्र राज्यात प्रशिक्षण घेण्याकरीता 'सहाय्यक पोलीस अधीक्षकाची' सात अधिसंख्य पदे निर्माण करण्यास व या सात परिविक्षाधीन अधिकाऱ्यांच्या या वरील कालावधीतील वेतन व भत्ते यासाठी रु.४३,१७,२२२/- (त्रेचाळीस लाख सतरा हजार दोनशे बावीस फक्त) इतका खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यास संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.

२. आता, या सात भापोसे अधिकाऱ्यांना दि.२५.०५.२०१९ ते दि.३१.०८.२०१९ या प्रशिक्षण कालावधीतील वेतन व भत्त्याकरिता आर्थिक वर्ष २०१९ - २० मध्ये मंजूर अनुदानातून एकूण रु.१६,९८,३५४/- (रुपये सोळा लाख अठ्ठ्यान्नव हजार तीनशे चौपन फक्त) मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासन आता, खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

भारतीय पोलीस सेवेच्या ७० व्या तुकडीतील खालील तक्त्यात नमूद केलेल्या ७ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांना दि.२५.०५.२०१९ ते दि.३१.०८.२०१९ या प्रशिक्षण कालावधीतील वेतन व भत्त्याकरिता एकूण रु.१६,९८,३५४/- (रुपये सोळा लाख अठ्ठ्यान्नव हजार तीनशे चौपन फक्त) इतका खर्च करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	प्रशिक्षणार्थीचे नांव	प्रशिक्षणासाठी नियुक्तीचा जिल्हा
१	कुमारी ऐश्वर्या शर्मा	कोल्हापूर
२	श्री. अनुराग जैन	अहमदनगर
३	श्री. नितीन दत्तात्रय बगाटे	सोलापूर ग्रामीण
४	श्री. गोरख सुरेश भामरे	अकोला
५	श्री. नवनीत कुमार काँवत	चंद्रपूर
६	श्री. श्रावन दत्त एस.	पालघर
७.	श्री. अनुज मिलींद तारे	ठाणे ग्रामीण

२. उपरोक्त ७ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांच्या वेतन व भत्यासाठी होणारा खर्च "२०५५-पोलीस-१०९ (०१) जिल्हा पोलीस बल " या उपलेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या अनुदानातून वेतन व भत्ते या उद्दीष्टामधून सन २०१९-२० या वर्षीच्या मंजूर अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय, क्र. पदनि २०१२/ प्र.क्र.६६/ १२/ वित्तीय सुधारणा, दिनांक ११ जुलै, २०१२ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०९१२२३३५१५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Tushar Vasant Mahajan

Digitally signed by Tushar Vasant Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, serialNumber=1a39cef3c157b9ee6a2abe5779acf233682613f7b9c335d6bf4877267695ceca, cn=Tushar Vasant Mahajan
Date: 2019.05.09 12:30:02 +05'30'

(तुषार महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
३. अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक,
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर, अहमदनगर, सोलापूर ग्रामीण, अकोला, चंद्रपूर, पालघर, ठाणे ग्रामीण
८. सह संचालक (तांत्रिक), लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई (२ प्रती).
९. वित्त विभाग (व्यय-७/वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई.
१०.सहाय्यक संचालक, भापोसे कक्ष, गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय, मुंबई.
११.अवर सचिव, कार्यासन बीयुडी-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.वैयक्तिक नस्ती / निवड स्ती (पोल-१).